वि. दि.दावा क्र.०३/२०१७ प्रशांत वि विजय 1
नि. क्र. २०

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. १ - प्रशांत विनायकराव झाडे.</u>**

**<u>साक्षीदाराचा पुढील सरतपास वादी तर्फे विद्वान वकील श्री मांडवकर मार्फत शपथेवर पुन्हा सुरु</u>**

प्रकरणात मी माझा पुरावा शपथपत्रान्वये सादर केलेला आहे. मला आता ते शपथपत्र दाखवले. त्यावर माझी सही आहे. त्यातील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे. दि. २९.११.२०१३ रोजी माझा सरतपास नोंदविण्यात आलेला आहे. त्या दिवशी दस्तावेजांना नि. क्र. देण्यात आलेला आहे.

**उलट तपास प्रतिवादी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्री राजकारणे यांच्या मार्फत**

मी पदवीधर आहे. मला मराठी, हिंदी व इंग्रजी वाचता व लिहीता येते. सन २००१ पासुन मी जीम चालवत होतो. सन २००८ मध्ये देखील मल जीम चालवत होतो. सन २००८ मी आयकर भरलेला नाही. हे खरे आहे की करारनामा नि. क्र २२ मध्ये उल्लेख केलेले आठ लाख रुपये मी कोठुन आणले याबाबत दाव्यात व शपथपत्रात तसेच करारनाम्यात काही नमुद केलेले नाही. सदर नमुद आठ लाख रुपये नगदी दिले, चेकने दिले किंवा कोणत्या पध्दतीने दिले याबाबत करारनाम्यात, दाव्यात व शपथपत्रात स्पष्टपणे काही नमुद केलेले नाही. हे खरे नाही की आठ लाख रुपये मी प्रतिवादी क्र १ ला दिलेच नाही. हे खरे नाही की नि. क्र २२ खोटा तयार केलेला आहे व त्यावर प्रतिवादी क्र १ ची मी खोटी सही केलेली आहे. ज्यावेळी करारनामा झाला त्यावेळी मी तहसील व रजीस्टी कार्यालयातुन सदर मिळकतीचा मुल्यांकनाचा दाखला प्राप्त केला नव्हता. हे खरे आहे की प्रतिवादीने खरेदी खत करुन देण्याससाठी यावे यासाठी मी प्रतिवादीला हा दावा दाखल करण्यापुर्वी पत्र किंवा नोटीस पाठविली नव्हती. मी व प्रतिवादी क्र. १ मित्र आहोत. हे खोटे आहे की प्रतिवादी क्र. १ व मी आणि ईतर आठ लोकांवर सन २०१८ मध्ये गुन्हा दाखल झाला होता. माझे म्हणणे आहे की

गुन्हाच दाखल झाला नव्हता. हे खोटे आहे की मी व प्रतिवादी क्र. १ नागपुर येथील कोर्ट क्र. ९ मध्ये फौजदारी खटला चालला होता. हे खोटे आहे की त्याचा क्र. ३०२८३०/२०१० असा होता. हे खोटे आहे की हे मी खोटे सांगत आहे की माझ्या विरुध्द वरील खटला चालला नव्हता.

हे खोटे आहे की प्रतिवादी क्र. १ मुळे माझ्या वरती केस दाखल झाली होती आणि मला त्यामुळे राग आला व मी नि. क्र. २२ खोटा करारनामा तयार केला व खोटा दावा दाखल केला. हे खोटे आहे की प्रतिवादी क्र. १ याने माझे सोबत कधीही कोणताही करारनामा केलेला नाही. हे खरे आहे की वाद मिळकत आज रोजी प्रतिवादी क्र २ च्या नावे आहे. प्रतिवादी क्र १ यांनी प्रतिवादी क्र. २ यांना सदर मिळकतीचे विक्रीपत्र करुन दिलेले आहे. करारनामा नि. क्र. २२ बाबत आवश्यक ते मुद्रांक भरलेला नाही व करारनामा रजीस्टर्ड केलेला नाही. हे खोटे आहे की माझ्या दाव्यातील व शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे खोटे आहे की की खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र. २ साठी विधीज्ञ श्री एम. आर. धांडे यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास तहकुब.**

समक्ष,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड
दि. ०५.०८.२०२५

श्रवणोत्तर स्विकृती,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड